**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यातल्या मोठ्या MIDC जवळ कामगांरासाठी सर्वसोयींनी युक्त निवास व्यवस्था तयार करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश

- मराठा आरक्षणासाठीच्या हैदराबाद गॅझेटच्या जीआरला आव्हान देणारी जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयानं फेटाळली, रीट याचिका कायम

- देशभरातल्या संपूर्ण मतदान प्रक्रियेत घोटाळा झाल्याचा काँग्रेस नेते राहुल गांधी यांचा आरोप केंद्रीय निवडणूक आयोगानं फेटाळला

**आणि**

- युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या तात्पुरत्या यादीत महाबळेश्वर आणि पाचगणीचा समावेश

**<><><><>**

राज्यात मोठ्या औद्योगिक वसाहतींच्या ठिकाणी 'इंडस्ट्रियल टाऊनशिप' उभारण्यात याव्यात. या टाऊनशिप मध्ये संपूर्ण नागरी सुविधा देण्यात यावेत, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज मुंबईत घेतलेल्या बैठकीत दिले. उद्योगाच्या आजुबाजूलाच निवासाची सुविधा मिळाल्यास कामगारांची क्षमता वाढेल. शहरात, गावात मिळणारे सर्व अधिकार येथे राहणाऱ्या नागरिकांनाही मिळतील, याची व्यवस्था करावी, असं ते म्हणाले. या बैठकीत झालेल्या इतर निर्णयांविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून…

- - होल्ड - मुख्यमंत्री व्हाइस कास्ट- -

*(सूक्ष्म आणि लघुउद्योग, अन्नप्रक्रिया उद्योग यासाठी जमिनीच्या काही मर्यादेत अकृषक परवान्याची अट काढण्याचा निर्णय राज्य सरकारने आज घेतला. यामुळे अकृषक परवाना मिळण्यासाठी लागणाऱ्या वेळेची बचत होऊन वेळेत उद्योग सुरू करणे सोयीचे होईल. अन्य शिष्यवृत्तीच्या योजनांच्या धर्तीवर उद्योगात काम करणाऱ्या कामगारांसाठी शिष्यवृत्ती योजना आणावी. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांचे शासनाकडून अदा करण्यात*

*येणाऱ्या देयकांसाठी ऑनलाइन पोर्टल तयार करावे. यामध्ये देयक अदायगीची ' ऑटोमॅटेड सिस्टीम' असावी. तसेच सेवा पुरवठादाराला त्याच्या देयकाची स्थिती कळावी, असेही मुख्यमंत्री म्हणाले.*

*कर्करोगासारख्या दुर्धर आजारांची लक्षणे आणि वेदना कमी करणारी औषधे वापराबाबत आणि उपलब्धतेसाठी धोरण बनवावे. 'पॅलॅटिव्ह केअर पॉलिसी' अंतर्गत आवश्यक नियंत्रक प्रणाली उभारावी, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. देशांतर्गत मागणी पूर्ण करण्यासाठी सागवानची लागवड वाढवावी, असंही त्यांनी सांगितलं.)*

**<><><><>**

मराठा समाजाच्या नागरिकांना इतर मागासवर्गीय प्रवर्गांतर्गत कुणबी जातीचं प्रमाणपत्र देण्याच्या हैदराबाद गॅझेट विषयक शासन निर्णयाला आव्हान देणारी जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयानं आज फेटाळली. याच मुद्द्यावरची रीट याचिका आधीच न्यायालयासमोर प्रलंबित असल्याचं मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठानं नमूद केलं आणि एकाच विषयावरच्या अनेक याचिका दाखल करून घेता येणार नाहीत, असं सांगत याचिका फेटाळून लावली.

**<><><><>**

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात निर्दोष सुटलेले सात जण, राष्ट्रीय तपास यंत्रणा आणि महाराष्ट्र सरकारला आज मुंबई उच्च न्यायालयानं नोटिस बजावली आणि सहा आठवड्यांच्या आत उत्तर मागितलं. माजी भाजपा खासदार प्रज्ञा सिंह ठाकूर यांच्यासह इतरांच्या सुटकेला आव्हान देणाऱ्या याचिकेवर मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर आज सुनावणी झाली.

**<><><><>**

वाशी मधल्या रहिवासी सोसायट्यांमधलं न्यायालयाच्या आदेशानुसार सुरू असलेलं अनधिकृत बांधकामाचं पाडण्याचं काम उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कोणत्या अधिकारात थांबवलं, असा सवाल मुंबई उच्च न्यायालयानं आज विचारला. इथल्या दोन रहिवासी सोसायट्यांमधला अनधिकृत बांधकामाच्या विरोधात एका स्वयंसेवी संस्थेनं मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

**<><><><>**

सेवा आणि सुशासनाच्या मार्गावरून चालताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार देशाच्या सर्व समावेशक प्रगतीसाठी प्रयत्नशील आहे. सरकारने शेतीला तंत्रज्ञानाची जोड देत शेतकऱ्यांच्या मेहनतीला नवा आयाम दिला आहे. याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

**होल्ड - व्हॉईस कास्ट**

*(कृषी क्षेत्रात सरकारने सुरू केलेलं डिजिटल कृषी अभियान शेतीच्या प्रत्येक टप्प्यावर अचूक परिणाम साधत आहे. उपग्रह, सेन्सर्स तसंच मोबाईल ॲप्लिकेशन यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शेतीचं नियोजन, सिंचन पुरवठा आणि पीक संरक्षणाबाबत मार्गदर्शन मिळत आहे. ई-नाम या माध्यमातून देशभरातल्या एक हजारांहून अधिक बाजारपेठा जोडल्या गेल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालासाठी योग्य मोबदला मिळत आहे. अ◌ॅग्री-स्टॅक अंतर्गत किसान ड्रोन आणि जिओ-टॅग केलेले पीक डेटा शेतकऱ्यांना मातीचं आरोग्य, हवामान आणि कीटक नियंत्रणाबद्दल रिअल टाईम माहिती पुरवत आहे.*

***होल्ड.. बाईट - प्रधानमंत्री***

*नमो ड्रोन दीदी उपक्रमाद्वारे, ग्रामीण महिलांना ड्रोन चालवण्याचं, शेतात फवारणी करण्याचं, पिकांचे मॅपिंग करण्याचं आणि कार्यक्षमता सुनिश्चित करण्याचं प्रशिक्षण दिलं जात आहे.)*

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या बालपणाबद्दल सांगणारा ‘चलो जीते है’ हा चित्रपट राज्यभरात विविध चित्रपटगृहांमध्ये दाखवण्यात येत असून त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. मुंबई आणि नवी मुंबईतही याचं प्रक्षेपण झालं. ऐकूया काही प्रेक्षक आणि विद्यार्थ्यांच्या प्रातिनिधिक प्रतिक्रिया.

***होल्ड... बाईट १***

***होल्ड... बाइट २***

**<><><><>**

**अहिल्या नगर** जिल्ह्यात राहता इथं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानमित्त छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत जिल्हास्तरीय सेवा पंधरवड्याचं आयोजन करण्यात आलं आहे. या सेवा पंधरवड्यात पाणंद इथले रस्ते अतिक्रमणमुक्त

करणं, विविध कागदपत्रांचं वाटप, अनेक योजनांची अंमलबजावणी करणार असल्याचं पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितलं.

**भंडारा** जिल्ह्यातही नमो नेत्र संजीवनी आरोग्य अभियानाचा शुभारंभ झाला. या विशेष मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील प्रत्येक तालुका आणि गावपातळीवर नेत्र तपासणी शिबिरे घेण्यात येणार आहेत.

<><><><>

जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा कर परिषदेने नुकत्याच जीएसटी करांमध्ये सुधारणा केल्या. अनेक क्षेत्रांमध्ये दर कमी केल्यामुळे याचा फायदा सर्वसामान्यांना होणार आहे. पर्यावरणपूरक वाहतुकीत महत्त्वाचा घटक असलेला सायकल उद्योग सुलभ आणि माफक बनवण्याच्या उद्देशाने सरकारने महत्त्वपूर्ण दिलासा दिला आहे. सायकलवरचा जीएसटी १२ टक्क्यावरून ५ टक्के करण्यात आला आहे. त्याच प्रमाणे सायकलच्या भागांवरचा जीएसटी दर देखील १२ टक्क्यावरून ५ टक्के करण्यात आला आहे. येत्या सोमवारपासून नवे दर लागू होतील.

<><><><>

वस्तू आणि सेवा कर परिषदेनं केलेल्या कर सुधारणांची अंमलबजावणी २२ सप्टेंबरपासून होत असून याचा अर्थव्यवस्थेवर अनुकूल परिणाम होईल, असा विश्वास खासदार अशोक चव्हाण यांनी आज नांदेडमध्ये व्यक्त केला.

**- अशोक चव्हाण बाईट- -**

<><><><>

युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या तात्पुरत्या यादीत भारतातल्या सात नवीन नैसर्गिक स्थळांचा समावेश करण्यात आला आहे. या नवी स्थळांमध्ये महाराष्ट्रातलं पाचगणी आणि महाबळेश्वर इथलं डेक्कन ट्रॅप्सचा समावेश आहे.

पाचगणी आणि महाबळेश्वर इथले डेक्कन ट्रॅप्स ही कोयना अभयारण्याच्या परिसरात जांभा दगडांची वैशिष्ट्यपूर्ण रचना आहे. ही रचना लाव्हा रसाच्या ४० पेक्षा जास्त थरांमुळे निर्माण झाली असून दख्खन पठाराचा हा भाग जांभा दगडापासून बनलेल्या जगातल्या सर्वात मोठ्या भूभागांपैकी एक आहे.

<><><><>

देशभरातल्या मतदान प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात घोटाळा झाल्याचा आरोप लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज पुन्हा नवी दिल्लीत वार्ताहर परिषद घेऊन केला. यासाठी त्यांनी महाराष्ट्रातल्या राजुरा आणि कर्नाटकातल्या आळंद विधानसभा मतदार संघातली उदाहरणं उपस्थितांच्या समोर मांडली.  बनावट अर्ज, काही सॉफ्टवेअर वापरुन मतदारांची नावं वगळणं, बोगस मतदार घुसवणं हे प्रकार झाल्याचा दावा त्यांनी केला. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

**- - होल्ड - राहुल गांधी व्हाइस कास्ट- -**

*(राजुरा मतदारसंघात ६ हजार ८५० मतचोरी झाल्याप्रकरणी पोलिसांनी एफआयआरही दाखल केल्याचा दावा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. लोकसभा निवडणुकीनंतर या मतदारसंघात १८ हजार मते वाढली. एवढी मते कशी वाढली, याचा संशय आल्याने विधानसभा निवडणुकीपूर्वी तक्रार केली. या तक्रारीवरून सुमारे सहा हजार मते आयोगाने कमी केली, असा दावा काँग्रेस उमेदवार सुभाष धोटे यांनी केली. उरलेल्या मतांमध्येही बोगस मतदार असल्याचा धोटे यांचा आरोप आहे.*

*दरम्यान, राहुल गांधी यांनी केलेले सर्व आरोप हे निराधार असल्याचं केंद्रीय निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. ऑनलाइन पद्धतीने मतदारांना वगळता येत नसल्याचं स्पष्टीकरण आयोगानं दिलं आहे. २०२३ मध्ये आळंद मतदारसंघातून काही मतदारांना अवैधरित्या वगळण्याचे प्रयत्न झाले होते. याप्रकरणी निवडणूक आयोगाच्या प्रतिनिधींनी एफआयआर दाखल केला होता, असं निवडणूक आयोगानं कळवलं आहे. २०१८ मध्ये या मतदारसंघातून भाजपा तर २०२३ मध्ये काँग्रेस उमेदवार जिंकून आला होता.*

*राहुल गांधी संवैधानिक संस्थांवर सातत्यानं आरोप करुन लोकशाहीला कमकुवत करत आहेत. तसंच नागरिकांची ही दिशाभूल करत असल्याची टीका भाजपचे ज्येष्ठ नेते अनुराग ठाकूर यांनी केली.*

*पुरावे नसल्यानं मतचोरीच्या मुद्द्यावर राहुल गांधींना कायदेशीर लढाई लढायचीच नाही. केवळ मतचोरी झाली असा कांगावा करत देशभर राळ उडवून द्यायचा त्यांचा उद्देश असल्याचं भाजपा प्रवक्ते केशव उपाध्ये म्हणाले.)*

**<><><><>**

ज्येष्ठ इतिहास संशोधक आणि ‘शिवचरित्र’कार गजानन भास्कर मेहेंदळे यांच्या पार्थिवावर आज वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. तत्पूर्वी त्यांचं पार्थिव भारत इतिहास संशोधक मंडळात अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आलं होतं.

<><><>

नंदुरबारमध्ये आज शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. दुकानं, शैक्षणिक संस्थांमध्ये शुकशुकाट दिसून आला. व्यक्तिगत वादातून हद्दपार गुन्हेगार जयेश वळवी याच्या खुनाच्या निषेधार्थ हा बंद होता. या घटनेनंतर झालेल्या हिंसाचारप्रकरणी पोलिसांनी आत्तापर्यंत सहा जणांना अटक केली आहे.

<><><>

**हिंगोली** जिल्ह्यात अतीवृष्टीमुळे शेतीचं मोठं नुकसान झालं असून, जिल्ह्यात २ लाख ७१ हजार हेक्टर क्षेत्रावरचं पीक पूर्णपणे नष्ट झालं आहे. अतिवृष्टीनं बाधित शेतकऱ्यांच्या नुकसानीचे तातडीनं पंचनामे करून त्यांना मदत देण्याचे आदेश पालकमंत्री नरहरी झिरवळ यांनी दिले आहेत.

लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज जिल्ह्यातल्या नुकसानीची पाहणी केली. पुराच्या पाण्यामुळे झालेल्या नुकसानीचे तातडीनं पंचनामे करावेत, तसंच तेरणा नदीवर उजनी गावाजवळ पूल उभारण्यासाठी प्रस्ताव सादर करावा, असा सूचना त्यांनी यावेळी दिल्या. लातूर जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करावा या मागणीसाठी मनसेनं निलंगा तालुक्यात उपोषण सुरू केलं आहे.

**सोलापूर** जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आज दक्षिण सोलापूर, अक्कलकोट तालुक्यात नुकसानीची पाहणी केली.

<><><>

कोल्हापूर जिल्ह्यात सुमारे ७८ एकरावर पसरलेल्या या चित्रनगरीमध्ये येत्या महिन्याभरात सुमारे दहा ते पंधरा कोटी रुपयांची विविध विकास कामं सुरू होतील, तसंच या ठिकाणी चित्रपट विषयक प्रशिक्षण केंद्र सुरू होण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी दिली.

<><><>

माथाडी कामगारांच्या हक्कांवर गदा आणणाऱ्या कायद्यातल्या  दुरुस्त्या मागे घेतल्या नाहीत तर राज्यव्यापी जेल भरो आंदोलनाचा इशारा ज्येष्ठ कामगार नेते डॉ. बाबा आढाव यांनी दिला आहे. ते आज पुण्यात धरणे सप्ताह आंदोलनादरम्यान बोलत होते.

<><><><>

बंजारा समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गात समाविष्ट करण्यात यावं, या मागणीसाठी नांदेड जिल्ह्यातल्या किनवट तालुक्यात सकल बंजारा समाजाच्या वतीनं उपविभागीय अधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला.

<><><><>

येत्या दोन दिवसांत कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी, तर  मराठवाड्यात काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे. या काळात कोकणात आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

<><><><>

राज्य सरकारने आधुनिक औषधशास्त्र प्रमाणपत्र अभ्यासक्रम उत्तीर्ण होमिओपॅथी डॉक्टर्सना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमध्ये स्वतंत्र नोंदणी देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाला इंडियन मेडिकल असोसिएशनने विरोध दर्शवत राज्यभर संप आणि सेवा बहिष्कार पुकारला आहे. विविध जिल्ह्यात या संपाला प्रतिसाद मिळाला आणि अत्यावश्यक वगळता इतर सेवा बंद होत्या. यामुळं रुग्णसेवेवर होणाऱ्या परिणामांचा विचार करून डॉक्टरांनी संप घ्यावा असं आवाहन वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी केलं आहे.

//<><><><>//